परिवहन समितीच्या गुरूवार दि. ३०/०८/२०१८ रोजी दुपारी ०३:०० वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

**उपस्थित सदस्य**

| अ. क्र | नावे | पद |
|---|---|---|
| 1 | मा. श्री. जितेंद्र धनराज कुकडे | सभापती |
| 2 | मा. श्री. प्रवीण विलासराव भिसीकर | सदस्य |
| 3 | मा. श्री. नितीन रामभाऊ साठवणे | सदस्य |
| 4 | मा. सौ. मनिषा आशिष धावडे | सदस्या |
| 5 | मा. सौ. अर्चना विवेक पाठक | सदस्या |
| 6 | मा. सौ. उज्वला प्रकाश शर्मा | सदस्या |
| 7 | मा. सौ. वैशाली देवचंद रोहणकर | सदस्या |
| 8 | मा. सौ. कल्पना राम कुंभलकर | सदस्या |

अनुपस्थित सदस्य

| | | |
|---|---|---|
| 1 | मा. श्री. नितीश गंगाप्रसाद ग्वालबंशी | सदस्य |
| 2 | मा. सौ. विद्या योगेश मडावी | सदस्या |
| 3 | मा. सौ. अभिरूची अनिल राजगिरे | सदस्या |
| 4 | मा. श्री. नरेंद्र नत्थुजी वालदे | सदस्य |
| 5 | मा. श्री. विरेन्द्र घनश्यामदास कुकरेजा<br>सभापती स्थायी समिती – पदेन सदस्य | सदस्य |

उपस्थित अधिकारी

| अ. क्र | नावे | पद |
|---|---|---|
| 1 | श्री. रविंद्र ठाकरे | अति.आयुक्त |
| 2 | श्री. शिवाजी जगताप | परिवहन व्यवस्थापक |
| 3 | श्री. हरिश दुबे | निगम सचिव |

मा.सभापती, परिवहन समितीच्या सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

**ठराव क्रमांक ११** :— परिवहन विभाग मनपाचे आर्थीक वर्ष २०१८—१९ मधे मनपा निधीतुन रुपये १०० कोटी निधी मंजुर करण्यात आला असुन NMC The City of Nagpur Transport Fund या बँक ऑफ महाराष्ट्र, सिव्हील लाईन्स नागपूर च्या Current Account मध्ये माहे एप्रिल २०१८ला रूपये ४,८२,०३,९५९/— तिकीट विक्री चा महसुल जमा झाला आहे. त्यापैकी एप्रिल २०१८ ला एकुण रु. २७,१०,२५,५९१/— हा विविध लेखाशिर्षा अंतर्गत खर्च झाला आहे. सदर खर्चापैकी मनपा कडुन परिवहन विभागाकरिता उपलब्ध झालेल्या अनुदानातुन रुपये २३ कोटी ची रक्कम संबंधीत कंत्राटदारांचे देयकांच्या रक्कमेच्या अदायगीस्तव खर्ची करण्यात आली आहे.

या खर्चाचा लेखाजोखा परिवहन समिती समक्ष सादर करून व मान्यता प्राप्त करून कार्योत्तर वित्तीय मान्यता घेणाचा प्रश्न समितीने विचारात घेवून अति.आयुक्त रविंद्र ठाकरे हे महानगरपालिकेत नुकतेच रूजू झाले असल्याकारणाने त्यांना या विषयाच्या अभ्यास करण्याकरिता एक आठवडयाचा वेळ देण्यात यावा व तोपर्यंत हा विषय प्रलंबित ठेवून पुढच्या परिवहन समितीच्या सभेसमक्ष सादर करण्यात यावा अशी समितीने एकमताने मान्यता प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक १२</u> :— परिवहन विभाग मनपाचे आर्थीक वर्ष २०१८—१९ मधे मनपा निधीतुन रुपये १०० कोटी निधी मंजुर करण्यात आला असुन NMC The City of Nagpur Transport Fund या बँक ऑफ महाराष्ट्र, सिव्हील लाईन्स, नागपूर च्या Current Account मध्ये माहे मे २०१८ला रूपये ५,५९,७७,५७२/— तिकीट विक्री चा महसुल जमा झाला आहे. त्यापैकी मे २०१८ ला एकुण रु.५,९८,६९,४१७/— हा विविध लेखाशिर्षा अंतर्गत खर्च झाला आहे.

या खर्चाचा लेखाजोखा परिवहन समिती समक्ष सादर करून व मान्यता प्राप्त करून कार्योत्तर वित्तीय मान्यता घेणाचा प्रश्न समितीने विचारात घेवून अति.आयुक्त रविंद्र ठाकरे हे महानगरपालिकेत नुकतेच रूजू झाले असल्याकारणाने त्यांना या विषयाच्या अभ्यास करण्याकरिता एक आठवडयाचा वेळ देण्यात यावा व तोपर्यंत हा विषय प्रलंबित ठेवून पुढच्या परिवहन समितीच्या सभेसमक्ष सादर करण्यात यावा अशी समितीने एकमताने मान्यता प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक १३</u> :— परिवहन विभाग, मनपा चे आर्थिक वर्ष २०१८—१९ मध्ये मनपा निधीतून रु. १०० कोटी निधी मंजूर करण्यात आला असून NMC The City of Nagpur Transport Fund, या बॅक ऑफ महाराष्ट्र, सिव्हिल लाईन्स नागपूर च्या Current Account मध्ये सुरूवातीची शिल्लकसह माहे जुन २०१८ रू. ५,६४,२४,८२५/—तिकीट विक्रीचा महसुल जमा झाला आहे. त्यापैकी जुन २०१८ एकूण रु. ६,३२,७४,४६६/— हा विविध लेखा शिर्षाअंतर्गत खर्च झाला आहे.

या खर्चाचा लेखाजोखा परिवहन समीती समक्ष सादर करून व मान्यता प्राप्त करून कार्योत्तर वित्तीय मान्यता घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून अति.आयुक्त रविंद्र ठाकरे हे महानगरपालिकेत नुकतेच रूजू झाले असल्याकारणाने त्यांना या विषयाच्या अभ्यास करण्याकरिता एक आठवडयाचा वेळ देण्यात यावा व तोपर्यंत हा विषय प्रलंबित ठेवून पुढच्या परिवहन समितीच्या सभेसमक्ष सादर करण्यात यावा अशी समितीने एकमताने मान्यता प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक १४</u> :— परिवहन विभाग, मनपा चे आर्थिक वर्ष २०१८—१९ मध्ये मनपा निधीतून रु. १०८ कोटी निधी मंजूर करण्यात आला असून NMC The City of Nagpur Transport Fund, या बॅक ऑफ महाराष्ट्र, सिव्हिल लाईन्स नागपूर च्या Current Accountमध्ये माहे जुलै २०१८ रू. ६,९७,०७,०८९/— तिकीट विक्रीचा महसुल जमा झाला आहे. त्यापैकी जुलै २०१८ एकूण रु. ८,६९,७३,६६७/— हा विविध लेखा शिर्षाअंतर्गत खर्च झाला आहे.

या खर्चाचा लेखाजोखा परिवहन समीती समक्ष सादर करून व मान्यता प्राप्त करून कार्योत्तर वित्तीय मान्यता घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून अति. आयुक्त रविंद्र ठाकरे हे महानगरपालिकेत नुकतेच रूजू झाले असल्याकारणाने त्यांना या विषयाच्या अभ्यास करण्याकरिता एक आठवडयाचा वेळ देण्यात यावा व तोपर्यंत हा विषय प्रलंबित ठेवून पुढच्या परिवहन समितीच्या सभेसमक्ष सादर करण्यात यावा अशी समितीने एकमताने मान्यता प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक १५</u> :— अ) परिवहन विभागात शासन निर्णय दि. १७/१२/२०१६ तसेच ठराव क्र. २४, दि. १७/१०/२०१७ अन्वये श्री. रविंद्र पागे, मनुष्यबळ विकास तसेच प्रशासकीय अधिकारी, श्री. केदार मिश्रा, कार्यकारी/उप—अभियंता व श्रीमती. संध्या ठोंबरे, स्टेनोग्राफर म्हणुन नियुक्ती करण्यात आली होती. शासन निर्णयामध्ये ०१ वर्षाकरीता नेमणुकीची अट असल्याने त्यांचा कालावधी दि. ३१/०८/२०१८ ला संपुष्टात येत आहे. सदर कर्मचाऱ्यांनी या अवधीत आपले कामकाज उत्तमपणे सांभळला असल्याने त्यांना पुढील १२ महिन्याकरीता दि. ०१/०९/२०१८ ते ३१/०८/२०१९ मुदतवाढ देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून रविंद्र पागे यांची मुदतवाढ 12 महिन्याची न करता नियमाप्रमाणे मंजूर करण्यात येते व केदार मिश्रा आणि संध्या ठोंबरे यांचा कामाचा अहवाल परिवहन समिती समक्ष ठेवून त्यानंतर पुढची कार्यवाही करण्यात येईल अशी समितीने एकमताने मान्यता प्रदान केली.

श्री नितीन साठवणेः— मा.सभापती, या कर्मचा—यांचा परफार्मर्स् चांगला आहे हे कुणी ठरविले आहे. शांतीनगर घाटावरती जो बसथांबा देण्यात आला तो हटविण्याबाबत वारंवारं श्री. मिश्रा यांना सांगण्यात आले परंतु त्यांनी बसथांबा हटविण्याचे काम केले नाही. जर काम केले नाही तर कशावरून म्हणता येईल की परफार्मर्स् चांगला आहे. यांचा परफार्मर्स् चांगला आहे हे कोण ठरवितो.

परिवहन व्यवस्थापक(श्री.जगताप)ः— मा.सभापती महोदय, विभाग प्रमुख म्हणून परिवहन व्यवस्थापक ठरवितो.

श्री.प्रविण भिसीकरः— मा.सभापती, कंत्राट बेसिसवर कर्मचारी घेण्यासाठी नियमावली काय? कंत्राट बेसिसवर कर्मचारी घेण्याचा जो जी. आर. आहे त्याचे वाचन करावे. राज्य

शासनाने दिलेली नियमावली असते त्या नियमावलीचे वाचन करावे आणि त्यात नियमावलीनुसार कुठे बसते आहे ते सांगावे. कुठेही शासनात 12 महिन्याची मुदतवाढ देण्यात येत नाही. मुळात हा विषयच चुकीचा आहे. 11 महिन्याच्या वरती कंत्राट बेसिसवर मुदतवाढ देता येत नाही. हा विषय कुठून आला, तसेच वेळोवेळी समितीने दिलेल्या सुचनांचे सुध्दा पालन झालेले दिसत नाही. परिवहन समिती च्या बैठकीत देण्यात आलेल्या सुचनेप्रमाणे काम करण्यात आले असे सांगितले जाते परंतु तसे होत नाही.

परिवहन व्यवस्थापक(श्री.जगताप):— मा.सभापती महोदय, आपल्याला 3 पदाची अत्यंत आवश्यकता होती. त्यात प्रशासकीय अधिकारी, कार्य/उप अभियंता स्थापत्य अभियत्यांची आवश्यकता होती. या पूर्वी स्थापत्य अभियंता आणि विभागीय अभियंता म्हणून सोनकुसरे आणि गुप्ता यांनी कामकाज केले परंतु त्यांना इतर कामे असल्यामुळे त्यांचा इतका सहभाग राहायचा नाही. प्रशासकीय अधिकारी उपलब्ध नसल्यामुळे अनुभवी आणि महत्वाच्या...

श्री.प्रविण भिसीकर:— मा.सभापती, कंत्राट बेसिसवर यांना घेतल्यानंतर त्यांनी त्यांचे कामकाज उत्तम सांभाळलेले नाही याचे नंतर सांगावे. एक वर्षात त्यांनी चांगले काही काम केलेले आहे काय?

परिवहन व्यवस्थापक(श्री.जगताप):— मा.सभापती महोदय, श्री.पागे यांचे एकंदरीत कामकाज त्यांनी विभागामध्ये जी नस्ती सादर करण्याची कार्यपध्दती आहे ती चांगल्या पध्दतीने विकसित केली आहे. एकंदरीत विभागाचे कामकाजाचा व्याप आणि त्यांच्यावरती देखरेख प्रशासकीय अधिकारी म्हणून त्यांचे चांगले नियंत्रण आहे. महापालिकेतील कामकाजाचा अनुभव त्यांच्याकडे आहे. वर्ग 1 चे अधिकारी म्हणून ते निवृत्त झाले आहे. प्रतिनियुक्तीवर आलेले असले तरी महापालिकेची जी कार्यपध्दती आहे त्यांची त्यांना उत्तम जाण आहे. पागे यांचे पुर्णवेळ प्रशासकीय अधिकारी म्हणून निश्चितपणे चांगले काम होते. दुसरे, स्थापत्य अभियंता पदावरील व्यक्तिची सेवानिवृत्ती झाल्यानंतर एकाही व्यक्तिची नियुक्ती झाली नाही. त्याच्या नंतरचा कालावधी लोटल्यानंतर महापालिकेची कार्यपध्दती असलेले उप अभियंता स्थापत्य पदावर कंत्राट बेसिसवर नियुक्ती करण्यात आली. तिसरे, संध्या ठोंबरे हया राज्य सरकारच्या न्यायालयीन विभागामध्ये स्टेनो होत्या. राज्य शासनाचे मराठीत कारभार चालत असला तरी इंग्रजीमध्ये प्रामुख्याने पत्रव्यवहार होत असतो. त्यामुळे त्यांना दिलेल्या डिक्टेशनमध्ये स्टेनो म्हणून निश्चितच कमी चुका आणि दिलेले पत्र तयार होवून येतात. त्यामुळे त्यांचे काम बघून हा लेखाजोखा सादर केला. त्यांनी समाधानकारक काम केले आहे.

श्री.नितीन साठवणे:—मा.सभापती महोदय, उप अभियंता म्हणून काम करणार श्री. मिश्रा यांना वारंवारं सुचना देवूनही आमचे काम पुर्ण केले नाही. शांतीनगर घाटावरील बसथांब्याबाबत समिती सदस्या यांनी सुचना केली मी सुध्दा सुचना केली.

सभापतीः— कुंभलकर ताई यांनी दोन महिन्याआधी त्यांच्या प्रभागात बस शेल्टर उभारण्याबाबत सांगितले. परंतु उभारण्यात आले नाही. वर्ष—वर्ष होते बस शेल्टर लागत नाही त्याचा पाठपुरावा केला जात नाही. एकही निर्णय होत नाही. प्रवासी बस वाहतुकीच्या संदर्भात सदस्यांना राजीनामा देण्याची वेळ आली आहे. आम्हांला जनतेला उत्तर द्यावयाचे असते. बैठकीत वारंवारं सुचना केल्यानंतरही जगताप यांनी आजवर समितीकडे सहवाल सादर केलेला नाही.

<u>ठराव क्रमांक १६</u> :— आकाशवाणी चौक ते रिजर्व बॅक चौक या ८०० मिटर पामरोडवरील एकूण ०६ थांब्याचे, वाहतुक कोंडी होवू नये याकरीता मार्ग निहाय बस थांब्याचे वर्गीकरण करून दि. २०/०८/२०१८ पासुन अंमलबजावणी करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

सभापतीः— मागच्या आठवडयात स्टेअरिंग कमेटीची बैठक संपन्न झाली. त्या बैठकीमध्ये बस ऑपरेटर आणि सर्व अधिकारी उपस्थित होते. यामध्ये परिवहन समितीची काय भुमिका आहे, सभेची सुचना सुध्दा परिवहन समितीला येत नाही. त्यामुळे परिवहन समितीला निर्णय घेण्याचा अधिकार आहे की स्टेअरिंग समितीला अधिकार आहे यावर अति.आयुक्त साहेब उचित निर्णय झाला पाहिजे. दुसरे, ३६ बंद बस रूट करण्यात आले त्याच्या आधी ३६ रूट बंद करण्यात आले आणि आज ५ रूट बंद करण्यात आले, असे एकुण ७२ बस रूट बंद करण्यात आले. सदर विषयात परिवहन समितीला विश्वासात न घेता हे रूट बंद करण्यात आले त्यामुळे शाळेच्या विद्यार्थ्यांना फार अडचणीचा सामना करावा लागत आहे.

महानगरपालिकेच्या मालकीची जागा डेपोकरिता देण्यात आली होती ती महापालिकेला हस्तांतरीत झाली काय? त्या ठिकाणी महानगरपालिकेचे सेक्युरिटी गार्ड लावण्यात आले या दोन्ही विषयाचा अहवाल पुढच्या बैठकीत सादर करण्यांत यावा.

<u>ठराव क्रमांक १७</u> :— आजच्या सभेची कार्यवाही कायम करून ही सभा अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

सभापती
परिवहन समिती
महानगरपालिका,नागपूर